# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/02/2024 (बुधवार) दुपार


---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ५३००९४०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक २१/०२/२०२४ चे ०२.१२ वा. ते ०३.०५ वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, टाटा कंपनीची १६ चक्का वाहन क्र. एम. एच—२७/डी.एल— ७१६६ गाडी मध्ये अवैदयरित्या विनापरवाना रेती लोड करुन वाहुतक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून चांपा टोल नाका उमरेड रोड येथे नाकाबंदी करीत असताना एक अवैध रेती वाहतुक संबंधाने १६ चक्का वाहन क्र. एम. एच—२७/डी.एल— ७१६६ येतांना दिसले. सदर वाहनातील वाहन चालक व कंडक्टर यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव फारूख शहा अमानउल्ला शहा, वय ३५ वर्ष, रा. नावेड रोड खोलापूर ता. भातकुली जि. अमरावती (१६ चक्का वाहन क्र. एम. एच—२७/डी.एल— ७१६६ चा चालक ) अमित सुनिल गोंडाणे, वय २० वर्ष, रा. शेंदोडा ता. तिवसा जि. अमरावती (१६ चक्का वाहन क्र. एम. एच—२७/डी.एल— ७१६६ चा कंडक्टर) असे सांगितले. स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे १५ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १६ चक्का वाहन क्र. एम. एच—२७/डी.एल— ७१६६ किमती ५२,००,०००/—रू. ज्यामध्ये १५ ब्रास रेती प्रत्येकि किंमत ५०००/—रु एकुण किमत ७५०००/— रु., जुने वापरते ०२ ॲन्ड्राईड विवो कंपनीचे मोबाईल किमती २०,०००/—रू. नगदी ५९४०/—रू. असा एकुण ५३००९४०/—रू. मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे—१) फारूख शहा अमानउल्ला शहा, वय ३५ वर्ष, रा. नावेड रोड खोलापूर ता. भातकुली जि. अमरावती २) अमित सुनिल गोंडाणे, वय २० वर्ष, रा. शेंदोडा ता. तिवसा जि. अमरावती प्रशांत श्रावणजी बारई, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, गुरूदेव नगर मोझरी, ता. तिवसा ४) महेश हटवार, रा. आसपूर पवनी भंडारा** असे एकुण ०४ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे कुही येथे अप क्र. ९२/२४ कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण, खनिज अधि. ३ सार्वजनिक मालमत्ता दस्तऐवज अन्वये पो. स्टे. कुही येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर